# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
# कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**१०२) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १८.०२.२०२५**

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (११/०२/२०२५ ते १७/०२/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१९/०२/२०२५ ते २३/०२/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | दिनांक | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.६ | ३२.४ | ३२.० | ३१.६ | ३१.० | ३१.४ | ३१.६ | कमाल तापमान (अंसे) | ३५ | ३६ | ३५ | ३४ | ३३ |
| १५.५ | १४.७ | १२.७ | १२.५ | १२.७ | १४.१ | १२.३ | किमान तापमान (अंसे) | १४ | १३ | १५ | १३ | १२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | १ | ० | ० |
| ७२ | ८४ | ७० | ७३ | ७५ | ६१ | ७१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६५ | ६४ | ५९ | ५७ | ५६ |
| ० | २९ | ३५ | २७ | २८ | २८ | २० | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३१ | ३१ | २६ | २६ | २४ |
| १.० | १.० | १.१ | १.१ | १.० | १.० | ०.९ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | भुईमूग: फुलकिडे व माव्याच्या नियत्रणाकरीता डायमेथोएट ३० ईसी @ १७ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| साठवायाचे बियाणे | साठवणूक | साठवणीतील धान्याचे किड्यापासून सरक्षण करण्यासाठी कापणी केलेल्या पिकाच्या धान्यामध्ये ११-१२%, कडधान्ये ९%, तेलबिया ८% आणि भाजीपाला बियाणे ५-६% ईतका ओलावा राहील आशा पद्धतीने बियाणे वाळवावे. |
| हरभरा | काढणी | जिरायती हरभरा परिपक्क झाला असल्यास काढणी व मळणी करुन घ्यावी. हरभरा पिकाची काढणी घाट्यामध्ये १४ ते १६ % ओलावा असताना करावी त्यामुळे नुकसान कमी होते. हरभारा उन्हात वाळवून साठवणूक कोरड्या हवेशीर जागी करावी. |
| हरभरा | घाटे भरण्याची अवस्था | ज्या ठिकाणी हरभऱ्यात मोठ्या अवस्थेतील घाटे अळी आढळून येत असेल तर इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के दाणेदार ४ ग्रॅम मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे (एकरी २०० लिटर पाणी).<br>पिवळी पडलेली रोगग्रस्त झालेली किंवा वाळलेली झाडे उपटून नष्ट करावी.<br>हरभरा पिकात खुजा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास रस शोषणाऱ्या किडींचा बंदोबस्त करावा. |
| मका | दाणे भरताना | अमेरिकन लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता, अळीच्या वाढीच्या सुरुवातीला (एक ते तीन अवस्था) अवस्थांमध्ये निंबोळी अर्क ५% याची ५ मिलि प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>किटकनाशकांची फवारणी केल्यानंतर मका पिकाचा हिरवा चारा लगेल जनावरांना खायला देऊ नये किंवा असा चारा लगेच सायलेस तयार करण्यासाठी वापरू नये. |
| करडई | फुलोरा अवस्था | मागील आठवड्यातील ढगाळ आणि आर्द्र हवामानामुळे करडईवर करपा रोग येण्याची शक्यता असून त्याच्या नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम + मॅन्कोझेब या संयुक्त बुरशीनाशकाची २ ग्रॅम प्रति लिटर पाणी तसेच करडईवरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी २० ईसी फेनवलरेट ५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| गहू | पोटरी ते ओंब्या लागणे | सद्य:स्थितीत ओंब्या बाहेर पडल्या आहेत. अशावेळी वारा नसताना पाण्याची पाळी द्यावी. कारण त्यामुळे गहू लोळण्याची शक्यता असते. ओंब्या बाहेर पडल्यानंतर पिकास तुषार सिंचन पद्धतीने पाणी देऊ नये. कारण त्यामुळे गव्हाच्या दाण्यांची चकाकी कमी राहून दर्जात घट होते.<br>गव्हावरील मावा नियंत्रित करण्यासाठी पिकावर थायमिथोक्सम (२५ डब्ल्यूजी) १ ग्रॅम किंवा ॲसिटामिप्रिड (२० एसपी) ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| भुईमूग | रोप अवस्था | पेरणीनंतर नांग्या आढळून आल्यास बी टोकून ते ताबडतोब भरावेत. १० ते १२ दिवसांच्या अंतराने २ ते ३ कोळपण्या कराव्यात व २ खुरपण्या कराव्यात.<br>फुलकिडे व माव्याच्या नियत्रणाकरीता डायमेथोएट ३० ईसी @ १७ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. |
| भाजीपाला पिके | | जानेवारी महिन्यात लागवड केलेल्या भाजीपाला पिकाची खुरपणी करुन पीक निहाय शिफारसीनुसार नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा. |

| | | |
|---|---|---|
| **पशुधन** | | वाढत्या तापमाच्या अनुषंगाने जनावरांना सावलीत बांधावे आणि पिण्यास भरपूर स्वच्छ आणि थंड पाणी द्यावे. हिरवेगवत, प्रथिनेयुक्त, खनिज मिश्रण आणि मीठयुक्त खाद्य द्यावे. जनावरे सकाळी किवा सायंकाळी चरावयास न्यावे/ सोडावे.<br>तापमान कमी करण्यासाठी शेडचे छत पेंढ्याने झाकावे तसेच भिंतींना पांढरे रंग द्यावा किंवा भिंतींना शेण-मातीचा लेप लावावा. |

**स्रोत** :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.

दि. : १४.०२.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**

**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**